नाशिक महानगरपालिका, नाशिक
राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक ४२२००२
दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान (DAY-NULM)
ईमेल : nulmnashik@gmail.com / nulm@nmc.gov.in संपर्क क्र.: ०२५३ - २२२२४३०

जा.क्र./NULM/DJAY-S/CLAP/४३/२०२५ दिनांक: १७/०३/२०२५

# नामनिर्देशन जाहिरात सूचना

शहर अभियान व्यवस्थापन कक्ष, नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात नवीन पथदर्शी “दीनदयाळ जन आजीविका योजना (शहरी)” ची अंमलबजावणी पुढील ५ वर्षात करावयाची असल्याने योजने अंतर्गत शहर उपजीविका कृती आराखडा (CLAP) तयार करण्यासाठी “शहर उपजिविका टास्क फोर्स” (CLTF) समिती गठीत करण्यासाठी शासनाचे निर्देश आहे.

दारिद्र्य निर्मूलनासाठी नवीन पथदर्शी “दीनदयाळ जन आजीविका योजना (शहरी)” योजनेचा उद्देश व्यावसायिक, सामाजिक आणि निवासी वंचितता दूर करणे आहे. अभियानांतर्गत बहु-आयामी धोरण आखले आहे, यामध्ये वंचित समुदायांचे संघटन तयार करणे आणि समुदाय संस्थांना बळकट करून उपजीविकेच्या संधीं निर्माण करणे आणि प्रोत्साहन देणे. समूह नेतृत्व मॉडेल सक्षम करणे, वित्तीय समावेशन, सामाजिक पायाभूत सुविधेसाठी सहकार्य निर्माण करणे, सामाजिक सुरक्षा आणि योजनांचा लाभ प्रदान करणे तसेच नवीन उपक्रम आणि सहयोग वाढवणे. बांधकाम कामगार, वाहतूक कामगार, गिग कामगार, व्यक्तिगत सेवा कामगार, स्वच्छता कामगार आणि घरगुती कामगार, तसेच महिला, वृद्ध, दिव्यांग, स्थलांतरित आणि नागरी गरिबां व्यतिरिक्त इतर उपेक्षित समुदाय, ज्यांना आर्थिक नुकसानीमुळे गरिबीत ढकलले जाण्याचा धोका आहेत अशा वंचित व्यावसायिक गटांवर लक्ष केंद्रित करून त्यांना आवश्यक सहाय्य करणे असा आहे.

या अनुषंगाने “शहर उपजिविका टास्क फोर्स” (CLTF) समिती गठीत करणेसाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशनासाठी इच्छुक शासकीय/अशासकीय संस्था/संघटना व व्यक्तीकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | विभाग | सदस्य संख्या |
|---|---|---|
| १ | विविध संघटनांचे प्रतिनिधी | १ |
| २ | सामाजिक संस्था प्रतिनिधी | १ |
| ३ | शहरातील अभ्यासू, जाणकार असलेली व्यक्ती | १ |
| ४ | जेष्ठ नागरिक संघ/ वृद्धाश्रम प्रतिनिधी | १ |
| ५ | ई-कॉमर्सद्वारे सेवा देणाऱ्या संघटना/ कार्यालय प्रतिनिधी | १ |
| ६ | उद्योग व्यावसायिक संघटना प्रतिनिधी/ उद्योग प्रतिनिधी | १ |
| ७ | दिव्यांग कार्यालय/ विभाग प्रतिनिधी | १ |
| ८ | बांधकाम कामगार, वाहतूक कामगार, गिग कामगार, व्यक्तिगत सेवा कामगार, स्वच्छता कामगार आणि घरगुती कामगार कार्यालय/संघटना प्रतिनिधी | ६ |

वरील प्रमाणे CLTF समितीमध्ये येण्यास इच्छूक व्यक्तींनी दि. २०/०३/२०२५ रोजी दु. ४:०० वाजेपर्यंत स्वयं: हस्तलिखित अर्ज आपले पूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, कार्यालईन ई-मेल आयडी व आपल्याकडे असलेली नाशिक शहारातील वरीलप्रमाणे वंचित घटाबाबतची माहिती थोडक्यात अर्जासमवेत देण्यात यावी. एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास महिलांस CLTF मध्ये सदस्य होण्यास प्राथमिकता राहील. अधिक माहितीसाठी NULM विभागाशी संपर्क साधावा.

(XXX)
शहर प्रकल्प अधिकारी तथा सदस्य सचिव (CLTF)
शहर अभियान व्यवस्थापन कक्ष, नाशिक महानगरपालिका, नाशिक